आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

४ ऑगस्ट २०२४ - रविवार

**ठळक बातम्या**

- राज्याच्या विविध भागात पावसाचा जोर/ अनेक ठिकाणी धरणातल्या पाण्याचा विसर्ग.

- महायुती सरकारच्या लोककल्याणकारी योजना आणि सरकारचं कार्य जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस तर्फे राज्यात ‘जनसन्मान’ यात्रा काढण्यात येणार

- कृषी अर्थतज्ज्ञांच्या ३२व्या आंतरराष्ट्रीय परिषदेत परदेशी प्रतिनिधींकडून भारतातल्या कृषी क्षमतेची आणि कृषीक्षेत्रातल्या एकंदर यशोगाथेची प्रशंसा

- पॅरिस ऑलिम्पिकमध्ये आज बॅडमिंटनच्या उपांत्य फेरीत भारताच्या लक्ष्य सेनची लढत डेन्मार्कच्या व्हिक्टर ॲक्सेलसेन बरोबर होणार

**आणि**

- ज्येष्ठ गांधीवादी कार्यकर्त्या शोभना रानडे यांचं आज सकाळी पुण्यात निधन

**<><><><><>**

**मुंबई**सह राज्यभरात आज पावसाचा जोर असून अनेक ठिकाणी धरणांमधला विसर्ग वाढवल्यामुळे नद्यांकाठच्या गावांमधल्या नागरिकांना प्रशासनानं सावधानतेचा इशारा दिला आहे.

**मुंबई** आणि उपनगरांमध्ये काल रात्रभर जोरदार पाऊस झाला असून नवी मुंबईतही काल दुपारनंतर पावसाचा जोर वाढला. वाशीमध्ये एक झाड कोसळलं. मात्र, कोणतीही जिवितहानी झाली नाही.

**पुणे** जिल्ह्यात खडकवासला धरणाच्या सांडव्यावरून मुठा नदी पात्रामध्ये सुरू असणारा २९ हजार ४१४ क्युसेक्स इतका विसर्ग वाढवून आजपासून ३५ हजार २ क्युसेक्स इतका विसर्ग केला गेला आहे. पावसाच्या प्रमाणानुसार आणि येव्यानुसार विसर्ग पुन्हा कमी/जास्त करायची शक्यता प्रशासनानं व्यक्त केली असून नागरिकांना सावधानतेचा इशारा दिला आहे. पुणे शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या खडकवासला धरणासह पानशेत, वरसगाव आणि टेमघर या चारही धरणांच्या पाणलोट क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर धरणातून विसर्ग सुरु असल्यानं त्या-त्या नद्यांकाठच्या रहिवाशांना सावधानतेचा इशारा दिला आहे. त्यामुळे खडकवासला वगळता उर्वरित तिन्ही धरणं आता सुमारे ९५ टक्क्यांपर्यंत भरली आहेत. या धरणांच्या पाणलोट क्षेत्रांसह जिल्ह्यातल्या मावळ, मुळशी, वेल्हे आणि जुन्नर या तालुक्यांमध्येही मुसळधार पाऊस सुरु असून त्या परिसरातल्या धरणांमधूनही मोठ्या प्रमाणावर विसर्ग सुरु आहे. ताम्हिणी घाटासह पुणे जिल्ह्यातून कोकणात जाणारे अनेक घाटरस्ते बंद केले आहेत.

**पिंपरी चिंचवड** शहर परिसरात तसंच धरण क्षेत्रात पाऊस सुरू असून शहरातून वाहणाऱ्या पवना, इंद्रायणी आणि मुळा या नद्यांच्या पाणी पातळीत वाढ होत आहे. या पार्श्वभूमीवर महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी आपत्कालीन यंत्रणेला दक्ष राहायचे आदेश दिले असून नदीकाठी राहणाऱ्या नागरिकांनी सावध राहावं, असं आवाहन आयुक्तांनी केलं आहे. नदीकाठी बचाव कार्यासाठी यंत्रणा सज्ज ठेवली असून तात्काळ मदतीसाठी राष्ट्रीय आपत्ती निवारण दलाला शहरात पाचारण केल्याची माहिती आयुक्तांनी दिली आहे.

**नाशिक** शहरासह जिल्ह्यातल्या पावसाच्या स्थितीविषयी आमचे नाशिकचे वार्ताहर संजय पाठक यांनी माहीती दिली आहे.

**-बाईट: संजय पाठक-**

**सोलापूर** जिल्ह्यात भीमा नदीकाठच्या गावांना सर्तकतेचा इशारा दिला असून उजनी धरण ९० टक्यांहून अधिक भरलं आहे.

<><><><><>

कोकणात तुरळक ठिकाणी आज  मुसळधार ते अति मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. मध्य महाराष्ट्रात घाट माथ्यावर तुरळक ठिकाणी मुसळधार ते अति मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता असून  मराठवाड्यात तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह ताशी ३० ते ४० किलोमीटर वेगानं सोसाट्याचा वारा वाहण्याची आणि  हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता वेधशाळेनं वर्तवली आहे  विदर्भात आज तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळ, सोसाट्याचा वारा आणि मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. उद्यापर्यंत पुणे आणि सातारा जिल्ह्यांसाठी रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे.

<><><><><>

पुणे जिल्ह्यातल्या अनेक नद्यांच्या पाणी पातळीत झालेली वाढ आणि त्यामुळे या नद्यांवरच्या धरणांमधून वाढवलेल्या पाण्याच्या विसर्गाच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधून पुणे आणि पिंपरी चिंचवड शहरांमझल्या पूरपरिस्थितीचा आज आढावा घेतला. जिल्ह्यातल्या आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा सज्ज ठेवायचे आणि नदीकाठच्या सखल भागांमधल्या नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी तातडीने उपाययोजना करायचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत. खडकवासला धरणातला विसर्ग दिवसा वाढवून पाणीसाठा ६५ टक्क्यांवर आणावा, जेणेकरून रात्रीच्यावेळी पाऊस झाला, तर नदीपात्रात अधिक विसर्ग करावा

लागणार नाही, अशी सूचना मुख्यमंत्र्यांनी दिली. तसंच महापालिकेने ध्वनिक्षेपक आणि समाज माध्यमांद्वारे नागरिकांना खबरदारी घ्यायच्या सूचना द्याव्यात, आणि वेळोवेळी पूरपरिस्थितीची माहिती द्यावी, असं आवाहनही त्यांनी अधिकाऱ्यांना केलं.

**<><><><><>**

महायुती सरकारच्या लोककल्याणकारी योजना आणि सरकारचं कार्य जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस तर्फे राज्यात ‘जनसन्मान’ यात्रा काढण्यात येणार आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार या यात्रेच्या निमित्तानं सर्व जिल्ह्यांचा दौरा करणार आहेत.  यात्रेसाठी सात समन्वयकांची तर आठ सहसमन्वयकांची यादी प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांनी जाहीर केली आहे. त्यामध्ये समन्वयक म्हणून सहकारमंत्री दिलीप वळसे पाटील, वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ, कृषीमंत्री धनंजय मुंडे, अन्न आणि औषध प्रशासन मंत्री धर्मारावबाबा आत्राम, महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे, क्रीडामंत्री संजय बनसोडे, मदत आणि पुनर्वसन मंत्री अनिल पाटील यांची तर इतर आठ जणांचा सहसमन्वयक म्हणून समावेश केला आहे.

**<><><><><>**

अन्य राज्यातून बी ए एम एस केलेल्या महाराष्ट्रातल्या विद्यार्थ्यांना पदव्युत्तर आयुर्वेदिक शिक्षणासाठी राज्याच्या कोट्यातून प्रवेश देण्याचा निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतला आहे. मुंबईत काल महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांच्यासोबत झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. यावेळी मुख्यमंत्र्यांनी वैद्यकीय शिक्षण प्रधान सचिव दिनेश वाघमारे यांना पदव्युत्तर प्रवेश नियमांत आवश्यक ते बदल करून मान्यतेसाठी सादर करण्याचे निर्देश दिले. या

विद्यार्थ्यांना आता राज्याच्या शासकीय आणि खाजगी अनुदानित ८५ टक्के तसंच खाजगी विना अनुदानित ७०टक्के कोट्यातून प्रवेश घेता येणार आहे.

**<><><><><>**

नवी दिल्ली इथं आयोजित कृषी अर्थतज्ज्ञांच्या३२व्या आंतरराष्ट्रीय परिषदेत उपस्थित असलेल्या परदेशी प्रतिनिधींनी भारतातल्या कृषी क्षमतेची आणि कृषीक्षेत्रातल्या एकंदर यशोगाथेची प्रशंसा केली आहे. या सहा दिवसीय परिषदेला ७५ देशांमधले कृषी अर्थतज्ञ उपस्थित असून त्यांनी भारताच्या कृषिक्षेत्रातल्या कामगिरीचं आणि संशोधनाचं कौतुक केले आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते काल या परिषदेचं उद्घाटन झालं. भारत अनेक कृषी उत्पादनांमधला अग्रणी उत्पादक आहे, भारताची वैविध्यपूर्ण जैवसंस्था आणि कृषी शिक्षणासाठी आवश्यक पायाभूत सुविधा यांनी कृषी क्षेत्रातल्या भारताच्या प्रगतीमध्ये महत्वाचं योगदान दिलं आहे, असं बांगलादेशच्या प्रतिनिधींनी म्हटलं आहे. तर भारत कृषिक्षेत्रात झपाट्यानं प्रगती करत असून त्यादृष्टीनं होणारं संशोधन उल्लेखनीय आहे, असं केनियानं म्हटलं आहे. शेतीमधल्या पारंपारिक पद्धती आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा लाभ घेण्यासाठी भारत आणि इतर देशांमध्ये असलेलं सहकार्य महत्त्वपूर्ण असल्याचं मत जपानच्या प्रतिनिधीनं व्यक्त केलं आहे.

**<><><><><>**

अवयव प्रत्यारोपणासाठी मानवी अवयव हवाई मार्ग, रेल्वेमार्ग किंवा रस्त्याने एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेण्यासाठीची कार्यपद्धती केंद्रीय अर्थमंत्रालयानं जारी केली आहे. मानवी अवयवांचा पूर्ण उपयोग करून घेणं आणि त्यांची गरज असलेल्या रुग्णांसाठी हे अवयव उपलब्ध करून देणं हा या कार्यपद्धतीचा उद्देश असल्याचं आरोग्य सचिव अपूर्व चंद्रा यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

राज्यपालांच्या दोन दिवसीय परिषदेचा काल राष्ट्रपती भवनात समारोप झाला. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी एकमेकांच्या अनुभवातून शिकण्याच्या भावनेनं सर्वसमावेशक चर्चा करण्याच्या राज्यपालांच्या प्रयत्नांचं कौतुक केलं. सरकारी योजनांचे फायदे तळागाळातल्या नागरिकांपर्यंत पोहोचावेत, विशेषतः अनुसूचित जाती-जमाती आणि आदिवासींना या योजनांचा लाभ मिळावा याकरता राज्यपालांनी पुढाकार घ्यावा असं त्यांनी आपल्या समारोपाच्या भाषणात सांगितलं. आदर्श राज्याचा वस्तुपाठ प्रस्थापित करणं ही राज्यपालांची जबाबदारी असून प्रभावी कामकाजासाठी राज्यपालांनी संबंधित राज्य सरकारांशी सतत संवाद साधावा असं उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी यावेळी सांगितलं. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी राज्यपालांना राजभवनात शासनाचं आदर्श मॉडेल विकसित करण्याचं आवाहन केलं. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा देखील परिषदेला उपस्थित होते.

<><><><><>

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये आज बॅडमिंटनच्या उपांत्य फेरीत भारताच्या लक्ष्य सेनसमोर टोक्यो ऑलिम्पिकचा सुवर्णपदक विजेता डेन्मार्कचा व्हिक्टर ॲक्सेलसेन याचं आव्हान असेल. भारतीय प्रमाणवेळेनुसार दुपारी साडेतीन वाजता हा सामना सुरू होईल. लक्ष्य सेननं विजय मिळवला, तर त्याचं पदक निश्चित होईल. दुसरीकडे महिलांच्या मुष्टियुद्ध स्पर्धेत उपांत्यपूर्व फेरीत ७५ किलो वजनी गटात टोक्यो ऑलिम्पिकची पदकविजेती मुष्टियोद्धा लोव्हलीना बोर्गोहाइन हिचा सामना आज चीनच्या ली क्वियान हिच्याशी होईल. नेमबाजीत २५ मीटर जलद फायर पिस्तूल प्रकाराच्या पात्रता फेरीत अनीश भनवाला आणि विजयवीर सिद्धू लक्ष्याचा वेध घेण्याचा प्रयत्न करतील.

<><><><><>

भारत विरुद्ध श्रीलंकेत सुरू असलेल्या एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेतला दुसरा सामना कोलंबो इथल्या आर. प्रेमदासा मैदानावर होत आहे. श्रीलंकेनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला आहे. मालिकेताल पहिला सामना बरोबरीत सुटला होता.

**<><><><><>**

ज्येष्ठ गांधीवादी कार्यकर्त्या शोभना रानडे यांचं आज सकाळी पुण्यात  निधन झालं. त्या १०० वर्षांच्या होत्या. शोभना रानडे यांनी निराधार महिला आणि मुलांसाठी समाजकार्य केलं. भारत सरकारनं २०११ मध्ये त्यांच्या या सामाजिक कार्याची दखल घेऊन त्यांना पद्मभूषण पुरस्कार देऊन सन्मानित केलं होतं.

**//<><><><><>//**